*रे. मु. नं. २९/२०१४*
*निशाणी ८४*

| MHNS240001402014 | आबासाहेब बापुराव देशमुख, वगैरे<br>वि.<br>रेवजी उखा सुर्यवंशी(मयत)..वारस<br>हिरामण रेवजी सुर्यवंशी, वगैरे |
| --- | --- |

## निशाणी ८४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांच्याविरुध्द प्रतिदाव्यास झालेला विलंब विनाजबाब/कैफियत चा आदेश रद्दबातल होवुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांचे कथन की, वादी यांनी सदरचा दावा जाहिरनामा व कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी नं. १–अ ते १–उ हे हजर होवून त्यांनी त्यांची लेखी कैफियत, जबाब व प्रतिदावा दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यास निशाणी ६४ दिली असून त्यास वादीतर्फे कैफियत, जबाब दाखल करणे गरजेचे होते. परंतू वादी यांस दाव्याची पुढील तारीख माहिती नसल्याने व काही वादी मयत झालेमुळे प्रतिदाव्यास कैफियत व जबाब दाखल करण्यास सुमारे ८६४ दिवसांचा विलंब झालेला आहे.

**३.** वादी यांनी पुढे कथन केले आहे की, वादी यांना प्रतिदाव्यास कैफियत व जबाब दाखल करण्याची परवानगी न दिल्यांस वादी हे न्याय हक्कापासून वंचित होणार आहे. तसेच सत्य परिस्थिती पटलावर येणार नाही त्यामुळे प्रतिवादींचे काधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सदर दाव्याची गुणवत्तेवर अंतिम चौकशी होणे न्यायालचे

दृष्टीने आवश्यक असलेने विलंब माफ होवुन वादी यांना प्रतिदाव्यास कैफियत व जबाब दाखल करणेची परवानगी मिळणे आवश्यक व जरुर आहे. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचा खुलासा दाखल करून वादींच्या अर्जास आक्षेप घेतला. प्रतिवादी यांचे कथन की, सदरचा अर्ज हा कायदेशीर नसून सदरच्या दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकणेचे हेतून सदरचा अर्ज दिला आहे. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा. ही विनंती केली आहे.

**०५.** उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

**०६.** अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द जाहिरनामा व कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रकरण वादी यांनी प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास जबाब/कैफियत दाखल करणेकामी प्रलंबित आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. याशिवाय, वादी यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाच्या कारणापुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र नि.८५ दाखल केलेले आहे. वादी यांना प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर विलंब लक्षात घेता काही रक्कम खर्च म्हणुन त्यांच्याकडुन प्रतिवादी यांना दिल्यास प्रकरणाचा उद्देश सफल होईल व सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

*रे. मु. नं. २९/२०१४*
*निशाणी ८४*

## आ दे श

**०१.** वादी यांचा नि.क्र.८४ वरील अर्ज त्यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. ५००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

**०२.** वादी यांनी दंड रक्कम अदा केल्यानंतर त्यांना प्रतिदाव्याची कैफियत अभिलेखावर सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.03.04 16:32:32 +0530

**दिनांक : ०४/०३/२०२६**

**(मधुसूदन दिनकर महाडीक)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सटाणा.**